# सुधारीत प्रशासकीय मान्यता आदेश

जाक्र.बाकवि/अं.वाडी/जिवायो/सीआर-५६/कावि- २९/२०१९
महिला व बाल विकास विभाग,जिल्हा परिषद,लातूर
दिनांक :- १० / ०१ /२०१९

## ज्ञापन

**विषय** :- अंगणवाडी इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देणे बाबत .

लेखाशिर्ष - २२३६१३४६

**संदर्भ** :-१) शासन निर्णय,ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग मंत्रालय,मुंबई क्रं.झीडपी२००८/ /प्र.क्र.४४४/वित्त-९ दि.१५ जूलै २००८

२) नियोजन विभाग शा.नि.क्र.जिवायो-१००७/प्र.क्र.३९/का.१४४४,दि.१६ फेब्रुवारी,२००८

३) महाराष्ट्र जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६८ चे परीशिष्ट २

४) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग,क्र एबावि-२००८/प्रक्र-१७३/का-६ दि.१५ जानेवारी २०१०

५) शासन निर्णय क्र एबावि-२०१७/प्र.क्र.१०१/का.६ दिनांकः १५ डिसेंबर,२०१७

६) प्रशासकीय मान्यता आदेश क्र.बाकवि/अं.वाडी/जिवायो/सीआर-५६/कावि-६८७/१८ दि.२७.०९.२०१८

७) शासन निर्णय क्र एबावि-२०१७/प्र.क्र.७६/का.६ दिनांकः ११ ऑक्टोंबर,२०१८

जिल्हा वार्षीक योजना सन २०१८-१९ मधील प्राप्त तरतूदीनूसार संदर्भ क्र.६ अन्वये अंगणवाडी इमारत बांधकामांना प्रति अंगणवाडी रुपये ६,००,०००/- लक्ष (अक्षरी- सहा लक्ष ) प्रमाणे खालील अंगणवाडी इमारत बांधकामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आल्या होत्या. संदर्भ क्र.४ अन्वये अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामासाठी निश्चित केलेल्या नमुना आराखडा (Type Plan) नुसार संदर्भ क्र.७ अन्वये अंगणवाडी इमारत बांधकामासाठी सन २०१८-१९ या वित्तीय वर्षापासून बिगर अदिवासी क्षेत्रासाठी एका अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामासाठी रु.८.५० लक्ष (GST सह) निधी मंजूर करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे संदर्भ क्र.६ अन्वये या पूर्वी प्रदीन करण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात येत असून संदर्भ क्र.७ मधील शासन निर्णयानुसार,खालील प्रमाणे सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहेत.

| अ.क्र | तालूका | अंगणवाडी केंद्राचे नाव व क्रमांक | अंदाजीत मुल्य |
|---|---|---|---|
| ०१ | लातूर | भडी क्र.१ | ८,५०,०००/- |
| ०२ | | मुशिराबाद | ८,५०,०००/ |
| ०३ | | शिराळा क्र.४ | ८,५०,०००/ |
| ०४ | | महापूर क्र.३ | ८,५०,०००/ |
| ०५ | | साई क्र.२ | ८,५०,०००/ |
| ०६ | चाकूर | लिंबाळवाडी क्र.२ | ८,५०,०००/ |
| ०७ | | अंजनसोंडा क्र.२ | ८,५०,०००/ |
| ०८ | रेणापूर | माकेगांव | ८,५०,०००/ |
| ०९ | | कामखेडा क्र.१(द.व) | ८,५०,०००/ |
| १० | | कामखेडा क्र.४ | ८,५०,०००/ |
| ११ | | बिटरगाव | ८,५०,०००/ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | | कोष्टगांव क्र.४ | ८,५०,०००/ |
| १३ | | तळणी (मो) क्र.१ | ८,५०,०००/ |
| १४ | औसा | नागरसोगा क्र.५ | ८,५०,०००/ |
| १५ | | बुधोडा क्र.२ | ८,५०,०००/ |
| १६ | | चिंचोली काजळे क्र.३ | ८,५०,०००/ |
| १७ | उदगीर | लोणी क्र.२ | ८,५०,०००/ |
| १८ | | लोहारा (नरसिंगवाडी) | ८,५०,०००/ |
| १९ | | नळगीर क्र.४ | ८,५०,०००/ |
| २० | जळकोट | हवरगा (डोमगांव) | ८,५०,०००/ |
| २१ | शिरुर अंनतपाळ | लक्कडजवळगा क्र.१ | ८,५०,०००/ |
| २२ | देवणी | लासोना क्र.१ | ८,५०,०००/ |
| २३ | | धनेगांव क्र.३ | ८,५०,०००/ |
| २४ | अहमदपूर | जांब (उन्नी) | ८,५०,०००/ |
| २५ | | दक्षिण रुई | ८,५०,०००/ |
| २६ | | शिरुरताजबंद क्र.९ | ८,५०,०००/ |
| २७ | निलंगा | सोनखेड क्र.२ | ८,५०,०००/ |
| २८ | | माळेगांव क्र.६ | ८,५०,०००/ |
| २९ | | कोराळी क्र.३ | ८,५०,०००/ |
| ३० | | नणंद क्र.४ | ८,५०,०००/ |
| ३१ | | शेळगी क्र.३ | ८,५०,०००/ |
| ३२ | | अंबेगांव(म) क्र.२ | ८,५०,०००/ |

**नियम व अटी :-**

१. सदरील कामासाठीयेणाराखर्च-२२३६१३४६ अंगणवाडी इमारत बांधकामासाठी योजनांतर्गत अनुदान या लेखाशिर्षाखालीभागवावा.

२. सदर कामाची सुरुवात सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून सुरु होत आहे.

३. प्रस्तावित कामाचे वर्षनिहाय खर्चाचे नियोजन पुढील प्रमाणे राहील.

| आर्थिक वर्ष | अपेक्षित खर्च | सुरु असलेल्या इतर कामासाठी आवश्यक तरतुद | एकुण मंजुर तरतुद |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| सन २०१८-१९ | १७७.८३५ लक्ष | निरंक | ३५५.६७ लक्ष |

४. सुरु असलेल्या कामाच्या वित्तीय नियोजनाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ क्र | कामाचे नाव | एकुण अपेक्षित खर्च | मागिल वर्षाअखेर झालेला खर्च सन २०१७-१८ | चालु वर्षात अपेक्षित खर्च | पुढील वर्षासाठी Carry Forward करावयाची तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| 1 | अंगणवाडी इमारत बांधकामे. | १७७.८३५ लक्ष | -- | १७७.८३५ लक्ष | -- |

५. सुदरील अंगणवाडी इमारतीचे बांधकाम अंगणवाडीतील बालकांना येण्या-जाण्यासाठी सोईस्कर होईलअशा ठिकाणी तसेच अंगणवाडी भरत असलेल्या सध्याच्या ठिकाणाजवळ असल्याची खात्री करूनचबांधकाम हाती घ्यावे. बांधकामाचे मार्कआऊट देतांना संबंधीत अंगणवाडी पर्यवेक्षिका, अंगणवाडीकार्यकर्ती यांच्या सहमतीने जागा ठरवून मार्कआऊट द्यावे.

६. मंजूर अंगणवाडीचे बांधकामाची ई-निविदा प्रक्रिया संबधीत ग्रामपंचायतीने एक महिण्याच्या आत पूर्ण करावी.अन्यथा सदरील मंजूर काम रद्द केले जाईल.

७. अंगणवाडीसाठी खुली जागा संबंधीत ग्राम पंचायतीने उपलब्ध करून द्यावी.जागा निश्चीत करतांना गट विकास अधिकारी,बाल विकास प्रकल्प अधिकारी व सरपंच यांचेशी संपर्क साधूनच काम सुरू करावे. सदरील काम यापुर्वी कुठल्याही निधीतून झाले नसल्याची खात्री करावी. दि.३० जून २०१९ पर्यंत संबंधीत ग्राम पंचायतीने अंगणवाडी इमारत बांधकाम पूर्ण करावे अन्यथा सदर गावातील इमारतीची प्रशासकीय मान्यता तात्काळ रद्द करण्यात येईल.

८. मंजूर अंदाजपत्रक व शासनाचे संदर्भ क्रं.(४) अन्वये विहीत केलेल्या नमुना अंदाजपत्रकाप्रमाणे काम केलेजाईल याची दक्षता घ्यावी. अंदाजपत्रकामध्ये फळा, बेबी टॉयलेट व स्वयंपाक घराची तरतूदअसावी.तसेच आतील भींतीवर बोलकी अंगणवाडीच्या बाबी (उदा.पुर्व शालेय शिक्षण, अक्षरओळख, पक्षी/फळेओळख)आदी बाबी पेंट कराव्यात व याची तरतूद अंदाजपत्रकामध्ये करावी.

९. संदर्भ क्रं. ४ नुसार अंगणवाडी इमारत बांधकामाचे नियंत्रण व कामात सुसूत्रता रहावी यासाठी प्रत्येकटप्प्यावर(बांधकामाचा निर्णय घेवून त्याबाबतचे अंतिम देयक अदाई करेपर्यंत) कार्यवाही करतांना नियंत्रण अधिकारी म्हणून उप मुख्य कार्यकारी अधिकारी(बाक) यांची मान्यता घेणे बंधनकारक राहील.

१०. काम पुर्ण झाल्यावर याची नोंद ग्राम पंचायतीच्या(मालमत्ता नोंद वही)मध्ये नोंद घेण्यात यावी सदरचे बांधकाम सहा महिन्यात पूर्ण करण्यात यावे.

११. अंतीम देयकासोबत अंगणवाडी इमारतीचा फोटो जोडावा. इमारतीवर गावाचे नाव, कोणत्या योजनेतून बांधकामकेले आहे,बांधकामाचे वर्ष नमुद करावे व या बाबी फोटोमध्ये याव्यात. या बाबीच्या पळतांणीसाठी अंतीम देयक उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) यांचे मार्फत सादर करावे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) यांनी कार्यकारी अभियंता (बां.) यांचेकडून अंतीम देयक प्राप्त झाल्यानंतर एक दिवसात याची पडताळणी करून व त्यांचेकडील नोंदवहीत नोंद घेवून देयक वित्त विभागास पाठवावे.

१२. इमारत बांधकाम पुर्ण होताच संबंधीत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या ताब्यात द्यावी.

१३. सदरील मान्यता जिल्हा वार्षिक योजना-सन २०१८-१९ मध्ये प्राप्त होणा-या निधीच्या आधिन राहून देण्यात देण्यात येत आहे. सदरील कामासाठी महाराष्ट जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे सर्व नियम लागू रहातील.

१४. सदरील कामाची कार्यान्वयीन यंत्रणा संबंधीत ग्राम पंचायत राहील.सदरील कामे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यांचे मार्फत करण्यात यावीत.व सदरील कामांची ई-निविदा प्रक्रिया संबंधित ग्रामपंचायत मार्फत करुन घेवुन कामे पुर्ण करून घ्यावीत.

१५. काम पुर्ण करून घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता(बांधकाम) जिल्हा परिषद, लातूर यांचीराहील.जर यंत्रणेने कामाचा वेग / दर्जा समाधानकारक न ठेवल्यास संबंधीतावर कडक कार्यवाही व्हावी.

**स्वाक्षरीत**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,लातूर**

**प्रत** मा. जिल्हाधिकारी, लातूर यांना माहितीस्तव सादर.

**प्रत** मा. अध्यक्ष / उपाध्यक्ष/ सभापती सर्व विषय समिती, जि.प. लातूर.

**प्रत माहितीस्त व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर.

२) कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, लातूर.

३) गट विकास अधिकारी,पंचायत समिती------------------,जि. लातूर.

४) उपविभागीय अंभियता(बां)उंप विभाग---------

४) बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, ------------ जि. लातुर.

५) सरपंच/ग्रामसेवक, ग्राम पंचायत, ---------------- ता.------------- जि. लातूर.

**स्थळ प्रत मा.मु.का.अ.यांचे स्वाक्षरीत**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,लातूरकरीता**